REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २८ सप्टेंबर, १९३८ अंक ३९

सर्वांगीण प्रगति
सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष
वेस्टर्न इंडिया
लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड
सातारा शहर

१९३८ अखेर
आठवें मूल्यमापन
आणि
रौप्य महोत्सव

त्रैवार्षिक बोनस
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
कोणत्याही दृष्टीनें पहा
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोग्राफ प्रिंटिंग, सडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

The Co-operators' Book Depot.
9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
Specialising in
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.
किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.
धी इंडो फॉरिन एजन्सीज. (हि. नं. ६)
२५७।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

विविध माहिती

देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि.

वरील कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ६३ लक्ष रुपये आहे. मेसर्स देवकरण नानजी बँकिंग कंपनीचीं सर्व देणीं-घेणीं ह्या कंपनीनें स्वीकारलीं आहेत. बँकेची स्वतःच्या मालकीची इमारत आहे. बँकेस शेड्यूल्ड बँकेचा दर्जा लवकरच प्राप्त होईल. देवकरण नानजी १० आणि २० तोळे चांदीच्या विपा मुंबई येथील सरकारी टांकसाळीप्रमाणें लंडन येथील सरकारी टांकसाळींत पाडून घेण्यासंबंधीं सर्व व्यवस्था पुरी झाली आहे. ५० आणि १०० तोळ्यांच्या विपाहि लवकरच बाजारांत येतील. बँकेच्या कामकाजास २६ मे, १९३८ रोजीं प्रारंभ झाला आणि बँकेचे हिशेब १७ ऑगस्ट रोजीं पुरे झाले. ह्या अल्पावधींत तिला १,४७४ रु. नफा मिळाला, तो पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यांत येईल.

जनरल मोटार्सचें उत्पादन

हिंदुस्थानांत खपणाऱ्या बसेस आणि लॉऱ्या ह्यांपैकीं शेकडा ६२, म्हणजे तिहींत दोन मुंबई येथील जनरल मोटार्सनें बनविलेल्या असतात. अमेरिकन मोटारींपैकीं शेकडा ४२ जनरल मोटार्सच्या असतात. जनरल मोटार्सनें आपल्या मुंबईच्या कारखान्यांत आतांपर्यंत ७५ हजार गाड्या तयार केल्या त्यांपैकीं ६० हजार शेवरोलेट आहेत.

टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कं. लि.

वरील कंपनीस जून, १९३८ अखेर संपलेल्या वर्षी २६३ लक्ष रुपये नफा झाला. त्यापूर्वीच्या सालाच्या मानानें हा आकडा २३ लाखांनीं मोठा आहे. अहवालाचे वर्षी कंपनीनें १३ कोटि यूनिट्स वीज विकली. कंपनीचे पाण्याचे तीनहि तलाव चालू वर्षी पूर्णपणें भरून वहात आहेत.

लारखाना-जाकोबाबाद रेल्वे फाटा

सिंध प्रांतांतील लारखाना आणि जाकोबाबाद हीं शहरें ८४ मैल लांबीच्या रेल्वे रस्त्यानें जोडण्यास रेल्वे बोर्डानें नॉर्थ वेस्टर्न रेल्वेस मंजुरी दिली आहे.

सॅकरिनच्या उपयोगास बंदी

बाटल्यांतून विकल्या जाणाऱ्या गोड पेयांत साखरेचे जागीं सॅकरिन घातलेलें असतें. आठ औंसांच्या बाटलींत तीन चतुर्थांश ग्रेन, इतक्या भारी प्रमाणांत त्याचें मिश्रण केलेलें आढळतें. सॅकरिनमध्यें अन्नाचा अंश मुळींच नसतो आणि तें द्रव्य आरोग्यविघातक मात्र असतें. मुंबई शहरांत अन्नामध्यें सॅकरिनच्या मिश्रणास बंदी करण्यांत येणार आहे.

खोबरें

खोबऱ्याच्या जागतिक मागणीचा पंधरावा हिस्सा सिलोन पुरवितो. फिलिपाइन बेटें आणि डच ईस्ट इंडीज येथील खोबऱ्याची सिलोनी खोबऱ्याशीं स्पर्धा होते. हिंदुस्थानांतील नारळांची लागवड दक्षिण भागांतील संस्थानांत केंद्रीभूत झालेली आहे. ब्रिटिश हद्दींत फारच थोडी लागवड आहे. हिंदुस्थानामध्यें सिलोनी खोबऱ्याची मोठ्या प्रमाणावर आयात होते.

बंगाल प्रांतांतील नवीन रस्ते

बंगाल प्रांतामध्यें २१ हजार मैल लांबीचे ३४ मोठे रस्ते तयार करण्याचा तेथील सरकारचा विचार आहे. ह्या योजनेस लागणारा सुमारें ६५ लक्ष रुपयांचा खर्च चार-पांच वर्षांवर वाटून देण्यांत यावयाचा आहे.

दारूबंदीमुळें चार हजार लोक बेकार

मुंबई सरकारच्या सध्याच्या दारूबंदीच्या अंमलबजावणीचे धोरणामुळें सुमारें तीन ते चार हजार लोकांचा पूर्वीचा व्यवसाय नाहींसा झाला आहे.

इटालियन सैनिकांची हानि

इटली ॲबिसिनिया युद्धामध्यें मरण पावलेल्या, जायबंदी झालेल्या आणि बेपत्ता झालेल्या इटालियनांची एकूण संख्या १,६०० भरली. स्पेनमधील युद्धांत इटलीचे आजवर २,२२६ सैनिक मृत्युमुखीं पडले आहेत.

टाचण्या

एकट्या बर्मिंगहॅम शहरांत दर आठवड्यास ५० कोटि टाचण्या कारखान्यांत तयार होतात.

खंडकरी कायद्याच्या मसुद्यांत फेरफार

खंडकरी कायद्याच्या मसुद्याचीं कलमें असावीं तितकीं पुरोगामी नाहींत अशी तक्रार झाल्यामुळें त्यांत महत्वाचे फेरफार करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे असें म्हणतात.

मोटारकरांचें इंग्लंडमधील उत्पन्न

ग्रेट-ब्रिटनमधील राष्ट्रीय सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांस मोटार मालकांकडून करांचें एकूण वार्षिक उत्पन्न १२० कोटि रुपये मिळतें.

दुधांतील भेसळ

"निर्भेळ दुधांत, बाजारांत मिळणाऱ्या कांहीं पावडरींची भेसळ करण्यांत येते. मिसळण्यांत येणारी पूड ही शरीरास अपायकारक नसल्याकारणानें, त्याच्या विक्रीस प्रतिबंध करतां येत नाहीं. शुद्ध दुधाचा दर्जा प्राप्त न होणारें दूध विकणारांवर खटला करण्याचा अधिकार मुंबई शहर म्युनिसिपॅलिटीस आहे, आणि ती तो बजाविते." ना. डॉ. गिल्डर ह्यांनीं मुंबई प्रांतिक असेंब्लीमध्यें एका प्रश्नास उत्तर देतांना वरील खुलासा केला.

टर्फ क्लबानें भरलेला करमणुकीवरील कर

रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबानें मुंबई सरकारास गेल्या तीन वर्षांत ३ लक्ष ५९ हजार रुपये करमणुकीवरील कर भरला.

मुंबई-पुणें रस्त्याची सुधारणा

मुंबई-पुणें रस्त्याच्या आधुनीकरणाचें काम हातीं घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. २५ फुटांच्या रुंदीपैकी मधली २० फुटांची पट्टी सिमेंटची करून बाजूच्या प्रत्येकीं अडीच फूट रुंदीच्या पट्ट्या खडीच्या करण्याचें सरकारनें योजिलें आहे. सिमेंटच्या २० फुटी पट्टीपैकीं निम्मा भाग जलद वाहनांसाठीं, आणि निम्मा भाग बैलगाड्यासाठीं अशी रस्त्याची विभागणी होईल. मोटारींस, अर्थातच, सबंद रस्त्याचा उपयोग करतां येईल. सबंध योजनेस २६ लक्ष रुपये खर्च येईल, तो तीन वर्षांवर तरी विभागावा लागेल. चालू वर्षी ५३ लक्ष रुपये खर्चण्यांत येऊन बोर घाटांतील रस्त्याची सुधारणा पुरी केली जाईल.

मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

	किंमत रुपये
११-९-३८ ते १७-९-३८	३,१४,५८८
१८-९-३८ ते २४-९-३८	१८,९१,१२०
२१-९-३१ ते १४-९-३८	३,१९,५१,८७,४८१

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	४७०	६ "ॲगमार्क" नूप ...	४७४
२ हिंदी आयुर्विम्याचा धंदा	४७१	७ सहकारी चळवळ ...	४७५
३ ग्रेट ब्रिटनमधील सहकारी चळवळ ...	४७२	८ मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याचा अहवाल ...	४७६
४ सातारा जिल्हा लोकसेवा संघ	४७२	९ विमा कंपन्यांचें एकीकरण	४७६
५ स्फुट-विचार... ...	४७३	१० वर्धा येथील शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या ...	४७७
उतरलेले बाजारभाव आणि सरकारी सहाय–राष्ट्रसंघाचे कचेरींतील जागा–सहकारी बँकेचीं डिबेंचर्स–सहकारी शेतीचा एक प्रयोग		११ "महाराष्ट्र कारखानदार परिचय"	४७७
		१२ निवडक बाजारभाव	४७९

अर्थ

बुधवार, ता. २८ सप्टेंबर, १९३८

हिंदी आयुर्विम्याचा धंदा

हिंदी आयुर्विम्याचा धंदा सध्यां संक्रमणावस्थेंत आहे. गेल्या कांहीं वर्षांत अनेक नवीन विमा कंपन्या ह्या देशांत निघाल्या, परंतु त्यांपैकी कित्येकांस अपेक्षेप्रमाणें पुरेसें काम मिळत नसल्यानें आपलें वैयक्तिक अस्तित्व टिकविण्याची त्यांस विशेष अडचण भासत आहे. रिझर्व्ह बँकेकडे कांहीं विशिष्ट किंमतीचे रोखे अनामत ठेवण्याची कायदेशीर जबाबदारी विमा कंपन्यांवर टाकण्यांत आली आहे, यांचा हेतु विमेदारांच्या हिताचें संरक्षण करणें हा आहे आणि कायद्यांतील तो नियम किती आवश्यक आहे, ह्याचें प्रत्यंतर आतां दिसूं लागलें आहे. कित्येक विमा कंपन्यांजवळ रिझर्व्ह बँकेकडे अनामत ठेव ठेवण्यास पुरेसे पैसे नाहींत आणि त्यासंबंधांतील कायद्याचें उल्लंघन केल्याबद्दल कंपन्यांचे डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट्स आणि इतर अधिकारी ह्यांवर जाहीर रीतीनें नोटीस बजावण्याची पाळी हिंदुस्थान सरकारवर येत आहे. अशा प्रकारच्या नोटीसा वर्तमानपत्रांत वरचेवर दिसूं लागल्या आहेत ही गोष्ट चिंतनीय आहे. विमा व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांनीं दरसाल कांहीं किमान किंमतीचें काम कांहीं विशिष्ट खर्चाचे मर्यादेंत मिळविल्याखेरीज त्यांची प्रगति होऊं शकत नाहीं हें उघड आहे. नवीन कंपन्यांस पुढें येण्यासाठी जबर खर्च करावा लागतो आणि खर्चाचें हें प्रमाण वाढतच चाललेलें दिसतें. पहिलीं कांहीं वर्षें क्लेम्सच्या रूपानें विमेदारांस मोठ्या रकमा देण्याची पाळी कंपन्यांवर येत नाहीं आणि ह्यामुळें त्यांच्या सांपत्तिक स्थितीसंबंधानें प्रतिकूल ग्रह होण्याचा संभव नसतो. वीस–पंचवीस वर्षांनीं आपले पैसे आपणांस परत मिळतील ह्या भरंवशानें विमेदार दरसाल हप्ते भरीत असतो. ह्या हप्त्यांचा विनियोग पुढें उपस्थित होणाऱ्या क्लेम्सच्या तजविजीकडे न होतां चालू खर्चाकडेच पुष्कळांशीं होऊं लागला, तर विम्याचा मुख्य उद्देशच सफल होणार नाहीं. नवीन विमा कंपन्यांस आपलें कर्तव्य बजावतां येण्याचे मार्गांत, त्यांस मिळणारें अपुरें काम आणि तें मिळविण्यास येणारा जबर खर्च हे फार मोठे अडथळे आहेत. ह्यामुळें कित्येकांची परिस्थिति ओढाताणीची होऊन, रिझर्व्ह बँकेकडे डिपॉझिट ठेवण्यास त्या कित्येक वेळां असमर्थ होतात.

कांहीं नवीन कंपन्यांनीं ह्या विकट परिस्थितीमधून मार्ग काढण्यासाठी इतर कंपन्यांशीं एकत्रीकरण करण्याचा मार्ग अवलंबिला आहे. हें धोरण दूरदर्शीपणाचें आणि उचित असेंच आहे. व्यवहार किफायतशीर होण्यास तो कांहीं विशिष्ट किमान प्रमाणावर चालावा लागतो आणि तो तसा चालत नसल्यास अनेक कंपन्यांनीं एकत्रित होणें हाच सरळ मार्ग त्यांस मोकळा असतो. गेल्या शतकांत ग्रेट ब्रिटनमध्यें बँकांचीं संख्या बेसुमार वाढली आणि त्यांपैकी कित्येकांचा व्यवहार नीट चालेना, तेव्हां त्यांनीं एकत्रीकरणाचेंच अवलंबन केलें होतें. हिंदी विमा कंपन्यांनीं ह्या धोरणाचा विचार करण्याची आज वेळ आलेली आहे असें दिसतें. बंगालमधील अशा एका योजनेची माहिती ह्या अंकांत इतरत्र देण्यांत आलेली आहे. व्याजाचे दर सर्वत्र पडलेले असल्यानें नव्यानेंच गुंतविलेल्या रकमांवर चांगलें व्याज मिळणें अशक्य झालें आहे. जुन्या कंपन्यांचा पैसा मागेंच गुंतवला गेल्यानें त्यावर अद्याप बरें व्याज सुटतें. परंतु नवीन कंपनीस आपला पैसा किफायतशीर गुंतविण्यास आतां फारशी जागा नाहीं. ह्याचा परिणाम त्यांच्या नफ्यावर व बोनसवर होणार हें उघड आहे. म्हणजे, बोनस जाहीर झालें असतां कंपनीचा लौकिक वाढण्यास सहाय होण्याऐवजी तिच्या पॉलिसीचा गैरफायदेशीरपणा मात्र उघड होऊन तिचें पाऊल पुढें पडण्यास आणखी अडचण येणार. ही आपत्ती टाळण्यासाठी आपलें स्वतंत्र अस्तित्व राखण्याच्या मागें न लागतां दूरदर्शीपणानें एकत्रीकरणाचा मार्ग तिनें अवलंबणेंच योग्य होईल किंवा नाहीं ह्याचा निर्विकारपणानें विचार झाला पाहिजे.

जुन्या विमा कंपन्यांसहि पूर्वीप्रमाणें नवीन काम मिळविण्यास आतां अडचण पडूं लागली आहे. त्यांच्या कामांत दरसाल वाढ होत असली तरी तें मिळविण्यास येणारा खर्च ज्या मानानें उतरत जावयास पाहिजे, त्या मानानें तो अनेकांच्या बाबतींत उतरत चाललेला दिसत नाहीं. विमा कंपन्यांनीं मागें जाहीर केलेले बोनसचे दर टिकवितां येणें त्यांस ह्यापुढें जड जाईल हें स्पष्ट दिसत आहे. पूर्वी व्याजीं लावलेल्या रकमांवर आज बरें व्याज मिळत असलें, तरी त्याचें प्रमाण हळु हळु उतरत जाईल, हें उघड आहे. नवीन रकमांवर तर चांगलें व्याज पडण्याचा आज संभव नाहीं. ह्याचा परिणाम तात्काळ दिसून येणार नाहीं; तथापि, कांहीं वर्षांनीं जुन्या कंपन्यांस तो जाणवल्याविना रहाणार नाहीं. जननाचें प्रमाण घटलें म्हणजे त्याचा राष्ट्रावरील अनिष्ट परिणाम दृष्टोत्पत्तीस येण्यास पंचवीस वर्षें लागतात, त्याचप्रमाणें येथेंहि घडतें. गुंतविलेल्या रकमांपैकीं कोणत्या प्रमाणांत त्यांवर चांगलें व्याज मिळतें आणि मिळत नाहीं ह्यावरच कंपन्यांचा नफा अवलंबून असतो. हें प्रमाण हळु हळु प्रतिकूल होत चाललें आहे. व्याजाचे दर वाढले, म्हणजे जुन्या रोख्यांच्या किंमती उतरतात. उत्पन्नांत वाढावा येतो खरा, परंतु ताळेबंदांतील रोख्यांच्या बाजारभावांत आणि मूळ किंमतींत पडणारा अनुकूल फरक टिकत नाहीं. म्हणजे, एका बाजूनें फायदा झाला, तर दुसऱ्या बाजूनें तोटा होतो. कांहीं झालें, तरी बोनसच्या दराची कमाल मर्यादा सध्यापेक्षा विस्तृत होण्याचा संभव तूर्त तरी दिसत नाहीं. ग्रेट ब्रिटनमध्यें गेल्या वर्षी १९ विमा कंपन्यांचें मूल्यमापन झालें, त्यांपैकीं फक्त एका कंपनीनें आपला बोनसचा दर वाढविला. विमा कंपन्या बोनसच्या दराचा काम मिळविण्याकडे उपयोग करीत असतात आणि त्यामुळें बोनसला हिंदुस्थानांत विशेष महत्त्व प्राप्त झालेलें आहे. बोनसच्या दरांतील चढाओढ फार काळ टिकणार नाहीं, हें सांगावयास नकोच.

ग्रेट ब्रिटनमधील सहकारी चळवळ

उपभोक्त्यांच्या (कंझ्युमर्स) सोसायट्या

ग्रेट ब्रिटनमध्यें उपभोक्त्यांच्या सहकारी चळवळीची गेल्या वर्षांत अत्यंत झपाट्यानें वाढ झालेली आहे. १८८१ सालीं उपभोक्त्यांच्या सोसायट्यांची संख्या ९९५ होती आणि त्यांच्या पटावर ५½ लक्ष सभासद होते. १९३६ अखेर सोसायट्यांची संख्या १,२४२ झाली असून सभासदांची संख्या ७८½ लक्षांवर गेली आहे. ह्या सोसायट्या म्हणजे मर्यादित जबाबदारीचे भाग धारण करणाऱ्या सभासदांच्या संस्था होत. ग्रेट ब्रिटनमधील १ कोटि, १० लक्ष कुटुंबांपैकी ६० लक्ष कुटुंबाचा "कंझ्युमर्स" (उपभोक्त्यांच्या) सहकारी चळवळीशीं निकटचा संबंध येतो. ह्या सोसायट्या अद्याप मुख्यतः खाद्यपदार्थच पुरवितात. त्यांचे कायम अधिकारी जिनसांच्या किंमती ठरवितात. सोसायट्यांचे दुकानांतील विक्रीवर सभासदांस डिव्हिडंड मिळतें. १९१६ सालीं ह्या डिव्हिडंडचा सरासरी दर १ पौंड किंमतीच्या मालावर १ शिलिंग १०½ पेन्स असा होता.

किरकोळ दुकानदारी करणाऱ्या सोसायट्यांची व्यवस्था सभासदांनीं निवडलेली एक कमिटी पहाते. मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या सोसायट्यांच्या कमिट्या देखरेख ज्यास्त चांगली व्हावी ह्यासाठी उपसमित्या नेमतात. दुकानांचे मॅनेजर वगैरे नोकर कमिटीस जबाबदार असतात. नोकरांची निवड बहुधा सभासदांच्या मुलांतूनच केली जाते.

घाउक विक्री करणाऱ्या (होलसेल) सोसायट्यांचें आणि किरकोळीनें विक्री करणाऱ्या (रिटेल) सोसायट्यांचें परस्पर नातें हें किरकोळ विक्रीच्या सोसायट्या आणि त्यांचे व्यक्तिशः सभासद ह्यांमधील नात्याप्रमाणेंच असतें. इंग्लिश को. होलसेल सोसायटीच्या १,०५१ सभासदांपैकीं ८८२ किरकोळीनें विक्री करणाऱ्या सोसायट्या आहेत. सभासद–सोसायट्यांनीं निवडलेल्या २८ डायरेक्टरांच्या बोर्डाकडे होलसेल सोसायटीची व्यवस्था आहे. स्कॉटिश को. होलसेल सोसायटींत खासगी व्यक्तींसहि सभासद होतां येतें. ह्या होलसेल सोसायट्या मालाचें उत्पादन, त्याची विक्री, वहातूक इत्यादि कामें करतात. १९३६ सालीं इंग्लिश को. होलसेल सोसायटीनें सुमारें ५३ कोटि रुपयांच्या मालाचें उत्पादन केलें. को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटी बँक ही संस्था सोसायटीची एक शाखा ह्या नात्यानें चालविण्यांत येते. होलसेल सोसायटी हेंच तिच प्रमुख गिऱ्हाइक असलें तरी इतर ठेवींची संख्याहि लहान नसते. इंग्लिश आणि स्कॉटिश को. होलसेल सोसायट्यांची एक संयुक्त संस्था चहाचीं आणि कॉफीचीं मिश्रणें करण्याचा व कोको आणि चोकोलेट तयार करण्याचा धंदा करिते. को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटीची भागीदारीहि त्यांचेकडेच आहे. ह्या सोसायटीचें हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न ११ कोटि रुपये असून तिची जिंदगी ३५० कोटि रुपयांवर आहे. वरील वर्णनावरून ग्रेट ब्रिटनमधील आर्थिक जीवनाशी सहकारी चळवळीचा किती निकट संबंध आहे, हें ध्यानांत येईल.

सातारा जिल्हा लोकसेवा संघ

वरील संस्थेच्या कार्याचा १।८।१९३८ अखेरचा प्रथम वार्षिक अहवाल आमचेकडे आला आहे. सार्वजनिक कार्य करण्यासाठी सातारा जिल्ह्यापुरती लोकसेवकांची एकादी कायम संस्था असावी, ह्या कल्पनेचें वरील संघ हें फळ आहे. श्री. पांडुआण्णा शिराळकर ह्यांनीं प्रथम ३० हजारांची देणगी जाहीर करून कार्यास चालना दिली आणि श्री. भाऊसाहेब सोमण ह्यांनीं, त्यांस ६० व्या वाढदिवशीं जनतेकडून मिळालेली थैली ह्या कार्यास अर्पण केली. अहवालाचे वर्षी कार्याच्या निमित्तानें संस्थेच्या सेवकांनीं जिल्ह्यांतील सुमारें २५० गांवांस भेटी दिल्या. लोकांच्या गरजांचें त्यांनीं निरीक्षण केलें, त्याची हकीकत अहवालांत दिलेली आहे. शक्य ती खटपट करून गरजा भागविण्याचाहि संघानें यत्न केला. संघानें आरंभलेलें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे ह्यांत संशय नाहीं. खेडेगांवांची उन्नति झाल्याविना कोणतीहि राष्ट्रीय सुधारणा होणें कठीण आहे, हें आतां स्पष्ट झालें आहे. ज्यांना प्रत्यक्ष लोकसेवा करणें शक्य नाहीं, त्यांनीं लोकसेवा संघासारख्या संस्थेस द्रव्यसहाय अवश्य करावें. संघाचें कार्य भरीव व यशस्वी होणें जनतेच्या सहकार्यावर अवलंबून आहे.

जागतिक आर्थिक मंदी

१९२० ते १९३७ ह्या १७ वर्षांत खाद्य पदार्थांचें जागतिक उत्पादन दर माणशी १९ टक्के वाढलें. ह्याच मुदतींत इतर जिनसांच्या उत्पादनांत ४० टक्के वाढ झाली. तथापि १९२५ सालापासून वरीलपैकीं पहिल्यांत आणि १९२९ पासून दुसऱ्या प्रकारच्या मालाच्या दरमाणशीं उत्पादनांत कांहींच चढ-उतार झालेला नाहीं. गेल्या सालीं जागतिक उत्पादन मोठ्या प्रमाणावर झालें तरी आंतरराष्ट्रीय व्यापार १९२९ सालाचे मानानें कमी झाला.

सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् अ‍ॅण्ड बेरार

प्रॉव्हिन्शिअल् कोऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

नागपूर सिटी.

पैसे गुंतविण्यास उत्तम संधि.

गहाणी कर्जरोख्यांची तिसरी आवृत्ति

व्याजाचा दर ३½ दरसाल दर शेंकडा] रु. ४,००,०००. [मुदत २५ वर्षे.

दर्शनी किंमतीस विक्री

हे कर्जरोखे सरकारी रोख्यांप्रमाणें सुरक्षित. मुद्दल व व्याजाच्या फेडीसाठीं सरकारी हमी. सहामाही व्याज.

अर्ज ४ ते १५ ऑक्टोबर १९३८ पर्यंत घेतले जातील. सविस्तर माहितीसाठीं प्रसिद्धीपत्रक (प्रॉस्पेक्टस) मागवा.

जी. ए. भोंसुले—मॅनेजर

स्फुट विचार

शेतीच्या मालाचे उतरलेले बाजारभाव आणि सरकारी सहाय

शेतीच्या मालाच्या किंमती (विशेषतः कपास आणि गहूं ह्यांच्या पिकांच्या) अलीकडे पुन्हां उतरल्या आहेत. ह्या पिकांचा पुरवठा मागणीच्या मानानें मोठा झाल्यानें असा परिणाम घडून आला आहे. अशा मालास जगभर मागणी असल्यानें त्याची जागतिक बाजारपेठ बनून एका देशांतील त्याचे संबंधांतील परिस्थितीचा परिणाम इतरत्र भासल्यावांचून रहात नाहीं. शेतीच्या मालाची उपज किती होण्याचा संभव आहे ह्या विषयीं हिंदुस्थानांत सरकारी अंदाज प्रसिद्ध होत असतात, परंतु त्या मालाच्या पद्धतशीर विक्रीच्या व्यवस्थेस ह्या देशांत अजून प्रारंभहि झालेला नाहीं असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. इंग्लंड आणि अमेरिका ह्या सारख्या देशांत यासंबंधांत उत्कृष्ट तजवीज करण्यांत आली असल्यामुळें तेथील सरकारांस शेतीच्या मालाच्या किंमतीचें नियमन सहज करतां येतें. बाजारभाव विलक्षण उतरले असल्याकारणानें शेतकऱ्यांची मिळकत कमी होऊन त्या वर्गाची स्थिति असमाधानकारक झाली आहे. त्या बाबतींत ब्रिटिश आणि अमेरिकन सरकार आपल्या शेतकऱ्यांस बाजारभाव उचलून धरून सहाय करूं शकतें. कपास आणि गहूं ह्यांचें पीक मागणीच्या मानानें अधिक आहे असें दिसतांच अमेरिकन सरकार पुरवठ्याचा कांहीं भाग साठवणींत ठेवण्यास शेतकऱ्यांस मदत करतें व ब्रिटिश सरकारहि बाजारभाव विशिष्ट मर्यादेच्या खालीं न जाण्याची खबरदारी घेतें. ह्या प्रकारचें सरकारी धोरण हिंदुस्थानांत अमलांत नाहीं, ह्यामुळें हिंदी शेतकऱ्यांस बाजारभाव खाली गेले असतां सहाय मिळत नाहीं. सरकारी संरक्षण अव्यवहार्य आहे असें म्हणून येथील सरकार मोकळें होतें. मागणी-पुरवठ्याचा नियम येथें लागू आहे असें समजण्यांत येऊन हें सरकार निष्क्रिय बनतें. पण पाश्चात्य राष्ट्रांत शेतकऱ्यांच्या हितसंरक्षणार्थ योग्य उपाययोजना केली जाते.

हिंदी लोकांस राष्ट्रसंघाचे कचेरींत अधिक जागा द्या

राष्ट्रसंघाच्या बजेट कमिटीपुढें गेल्या आठवड्यांत भाषण करतेवेळीं, सर आर. के. षणमुखम् चेट्टी ह्यांनीं राष्ट्रसंघाच्या आणि आंतरराष्ट्रीय मजूर संघाच्या कचेऱ्यांत हिंदी लोकांस पुरेसा वाव मिळत नसल्याविषयीं तक्रार केली. राष्ट्रसंघाची वर्गणी देण्यांत हिंदुस्थानचा अनुक्रम वर असला तरी हिंदी लोकांस त्या मानानें संघाच्या कचेऱ्यांत नोकऱ्या दिल्या जात नाहींत आणि मिळालेल्या नोकऱ्याहि कनिष्ठ दर्जाच्या असतात, हें सर षणमुखम् ह्यांनीं स्पष्ट करून सांगितलें. हिंदुस्थानांतील वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांत लायक माणसांचा तुटवडा नाहीं आणि त्यांपैकीं एखाद्याची निवड करतां येणें शक्य आहे आणि राष्ट्रसंघाचे कार्याविषयीं हिंदुस्थानामध्यें लोकमत जागृत करण्यास त्याचा अतिशय उपयोग होईल, असें ते म्हणाले. राष्ट्रसंघाचीं कित्येक सभासद राष्ट्रें आपली वर्गणी वक्तशीरपणें देत नाहींत; हिंदुस्थानास भारी भुर्दंड पडून त्यापासून फायदा मात्र त्या मानानें नाहीं, अशी परिस्थिति आहे. ह्या संबंधांत हिंदुस्थान सरकारनें पुढाकार घेणें आवश्यक आहे. राष्ट्रसंघाचा एक स्थापक सभासद असण्याचा मान हिंदुस्थानास आहे; परंतु त्याचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग काय ?

सी. पी. ॲन्ड बेरार प्रांतिक सहकारी बँकेची डिबेंचर्स

सी. पी. ॲन्ड बेरार प्रांतिक सहकारी बँकेनें ३½% दराचीं ४ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स विक्रीस काढलीं आहेत. त्यासंबंधांत बँकेकडे १ नोव्हेंबर पूर्वी अर्ज आणि त्या सोबत मागितलेल्या डिबेंचर्सच्या किंमतीची शेंकडा ५ इतकी रकम हीं दाखल झालीं पाहिजेत. मध्यप्रांत आणि वऱ्हाड ह्या प्रांतांतील सहकारी लँड मॉर्गेज बँकांनीं प्रांतिक बँकेच्या नांवानें लिहून दिलेल्या गहाणखतांचें वरील कर्जास तारण आहे. डिबेंचर्स धारण करणारांतर्फे खुद्द रजिस्ट्रार हे ट्रस्टी असल्यानें आणि सरकारनें मुद्दलाच्या परतफेडीची व व्याजाची हमी घेतलेली असल्यानें, वरील डिबेंचर्स लोकप्रिय होतील, अशी अपेक्षा आहे. १ नोव्हेंबर, १९६२ रोजीं डिबेंचर्सची रकम हमखास परत मिळेल, परंतु १९४८ नंतर केव्हांहि तीन महिन्यांची नोटीस देऊन डिबेंचर्सची रकम परत करण्याचा बँकेस अधिकार आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्या डिबेंचर्सना " ट्रस्टी सिक्युरिटीज "चे सदरांत घातलें आहे, ह्यामुळें ट्रस्टचे पैसेहि त्यांत गुंतविण्यास प्रत्यवाय नाहीं. डिबेंचर्स वर्ग करतांना स्टँप ड्यूटी पडणार नाहीं. प्रांतिक सरकारची हमी, हिंदुस्थान सरकारनें दिलेल्या सवलती, ट्रस्टी सिक्युरिटीजमध्यें डिबेंचर्सचा होणारा अंतर्भाव, इत्यादि सर्व अनुकूल गोष्टींमुळें बँकेच्या डिबेंचर्सना चांगली मागणी येईल, असें वाटतें. डिबेंचर्सना सरकारी रोख्यांचाच दर्जा जवळजवळ प्राप्त झाला आहे. पैसे गुंतवूं इच्छिणारांनीं वरील डिबेंचर्सचा जरूर विचार करावा असें आम्हीं सुचवितों.

सहकारी शेती-इंग्लंडमधील एक प्रयोग

इंग्लंडमध्यें चेम्सफर्ड शेजारीं बोरहॅम ह्या गांवांत दोन हजार एकरांच्या क्षेत्रांत संयुक्त शेतीचा प्रयोग करून पहाण्यांत येत आहे. ब्रिटिश असोसिएशनची सभा केंब्रिज येथें नुकतीच भरली होती, तिला उपस्थित असलेले शेतकीतज्ञ ह्या प्रयोगाचें निरीक्षण करण्यासाठी गेले होते. इंग्लंडमध्यें चाललेला संयुक्त शेतीचा हा पहिलाच प्रयोग आहे. लॉर्ड पर्सी यांनीं अशी माहिती सांगितली कीं सहकारी पद्धतीनें शेती करणाऱ्या लोकांस वरील योजनेंत शेतकामाच्या मामुली मजुरीपेक्षा पंचवीस टक्के अधिक मेहनताना मिळून शिवाय नफ्यामध्यें पूर्ण हिस्सा मिळतो. सरकारनें जमीन विकत घेऊन ह्या पद्धतीनें शेतकऱ्यांस काम करण्याची संधी दिल्यास स्वतः घातलेल्या भांडवलावर चार टक्के व्याज त्यास सहज घेतां येऊन शेती किफायतशीर होईल असें लॉर्ड पर्सी यांचें म्हणणें आहे. जमीनीच्या मालकीची मक्तेदारी दूर करण्यास सहकारी शेती हें उत्कृष्ट साधन असून प्रस्तुत प्रयोग आणखी सहा वर्षें चालला तर सरकारकडे ह्या पद्धतीच्या शेतीसाठी भांडवलाची अशी जोराची मागणी येईल कीं ती नाकारणें त्यास कठीण जाईल असेंहि त्यांनीं सांगितलें. सहकारी शेतीच्या पद्धतीचें महत्व आणि त्याबाबतींतलें सरकारचें कर्तव्य हिंदुस्थानांत तर विशेष आहे, हें सांगावयास नको.

चलनाच्या किंमतीमधील चढउताराचा परिणाम

फ्रँक ह्या फ्रेंच चलनाच्या किंमतीमधील चढउताराचा परिणाम सुएझ कालवा कंपनीच्या भागांपैकीं ब्रिटिश सरकारच्या हातांतील भागांचे बाजारभावावर कसा होतो, हें खालील आकड्यांवरून दिसून येईल. ३१ मार्च, १९३७ रोजीं ब्रिटिश भागांची किंमत १०२ कोटि रुपये भरली, तीच ह्या वर्षीं फक्त ६०¾ कोटि रुपये झाली. मार्च, १९३७ मध्यें एका पौंडास १०५ फ्रँक मिळत असत; मार्च १९३८ मध्यें त्या चलनाची किंमत उतरून एका पौंडास १५३ फ्रँक मिळूं लागले.

" ॲगमार्क " तूप

दूध तूप, लोणी, इत्यादींमध्यें करण्यांत येणाऱ्या भेसळीस आळा घालण्याकरितां मुंबई सरकारनें प्रिव्हेन्शन ऑफ ॲडल्ट्रेशन ॲक्ट केला, त्यास तेरा वर्षे लोटून गेलीं, तरी आतांपर्यंत मुंबई, अहमदाबाद, सुरत आणि भडोच ह्या चारच शहरांनीं त्याची अंमलबजावणी करण्याचें ठरविलें. इतर शहरांस हा कायदा लागू करण्याचे मार्गांत मुख्य अडचण पैशाची येत आहे. गिऱ्हाइकास मालाची पारख करतां येणें कठीण असतें, ह्याचा फायदा दुकानदार आणि व्यापारी घेतात. ही भेसळ फारच मोठ्या प्रमाणावर चालू आहे. ह्या संबंधांत होत असलेल्या शिक्षांचा भेसळ करणारांवर विशेष परिणाम दिसून येत नाहीं. गिऱ्हाइकांस माल ओळखून घेतां यावा आणि उत्पादकांसहि आपल्या मालाची रास्त किंमत यावी, ह्यासाठी विस्तृत योजना करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवून १९३७ सालीं ॲग्रिकल्चरल प्रॉडयूस (ग्रेडिंग ॲन्ड मार्केटिंग) ॲक्ट तयार केला. ह्या कायद्याचे कक्षेंत तूर्त फळें, भाजी, अंडीं, दूध, लोणी, तूप, तंबाखू, कॉफी, कातडीं, इत्यादि जिन्नस येतात. तुपाची प्रत ठरवून त्याप्रमाणें त्यावरील शिक्का ठरविण्याचें काम आतां पूर्ण झालें आहे. मुंबईचे प्रांतिक मार्केटिंग अधिकारी, डॉ. घाटगे, ह्यांनीं ह्या संबंधांत एक पत्रक काढलें आहे. एका रुपयाच्या आकाराचीं 'ॲगमार्क' ह्या छापाचीं लेबलें डब्यावर पाहून घेतलीं असतां भेसळ तूप मिळण्याची भीति गिऱ्हाइकास उरणार नाहीं, असें त्या पत्रकांत म्हटलें आहे. हीं लेबलें सरकारी देखरेखीखालीं भरण्यांत येणाऱ्या डब्यांसच फक्त लाविलीं जाणार असल्यामुळें आणि सरकारी मार्केटिंग अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालीच सर्व काम होणार असल्यामुळें, गिऱ्हाइकांस चांगलें तूप निःसंशय मिळणें आतां शक्य झालें आहे. कलकत्ता आणि अलाहाबाद येथें 'ॲगमार्क' पद्धतीनें तूप करणाऱ्या कंपन्या स्थापन झाल्या असून, मुंबई शहरांतहि एका कंपनीनें नुकतेंच काम सुरू केलें आहे. मुंबईच्या बाजारांत 'ॲगमार्क' लेबलाचें तूप मिळूं लागलें आहे. २८ पौंडी, १४, पौंडी, ७ पौंडी आणि ३½ पौंडी डब्यांत तें विकलें जातें. मुंबई प्रांतांतील तुपाच्या मागणीचा विचार करतां 'ॲगमार्क' तूप करणाऱ्या अनेक कारखान्यांस वाव आहे असें दिसतें. जिल्ह्यांचे ठिकाणीं असे कारखाने लवकरच स्थापन होऊं लागतील असा रंग दिसतो.

इंडियन आयर्न ॲन्ड स्टील कं. लि.

वरील कंपनीची स्थापना १९१८ सालीं झाली, आणि तिच्या प्रत्यक्ष कामास १९२२ सालीं प्रारंभ झाला. मार्च, १९३८ अखेर कंपनीचें भाग भांडवल आणि डिबेंचर्स मिळून ४ कोटि, ६० लक्ष रुपयांची रकम होते. कंपनीचे एकूण रिझर्व्हज् सुमारें १½ कोटि रुपयांचे आहेत. वर्षअखेर कंपनीस १ कोटि, ७३½ लक्ष रुपये नफा झाला. लोखंड आणि पोलाद ह्यांच्या उत्पादनाविषयीं कंपनीच्या वार्षिक कारभाराची व्यापकता दर्शविणारे खालील आकडे उद्बोधक आहेत:—

कारखान्यांत दाखल झालेला कच्चा माल	२७¼ लक्ष टन
हिंदी रेलवेजना दिलेलें भाडें	१,०२¾ लक्ष रु.
आगबोट कंपन्यांना दिलेलें भाडें	५० लक्ष रु.
कामगारांस वेतन	५६½ लक्ष रु.
हिंदुस्थान सरकारास द्यावयाचा प्राप्तीवरील कर	२६½ लक्ष रु.

६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गांची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

कॉमनवेल्थ विमा कंपनी

लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

दि प्रॉव्हिन्शिअल बँक
ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट,
१७ मेनस्ट्रीट, पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट,
लक्ष्मीरोड, पुणें. २

प्रॉक्सीची पद्धति बंद करा

असि. रजिस्ट्रार, मि. अलमौला ह्यांचें पत्रक

कांहीं सोसायट्यांच्या कानूंप्रमाणें, साधारण सभेस सभासद हजर नसला, तरी प्रॉक्सीच्या पद्धतीनें त्यास मत देतां येतें. सोसायटीचें व्यवहार क्षेत्र अतिशय व्यापक असलें अगर तिच्या सभासदांची संख्या फार मोठी असली, तर प्रॉक्सीच्या ऐवजी खालील दुसऱ्या दोन मतदानपद्धति सरकारनें सुचविल्या आहेत आणि त्यांपैकीं सोईची वाटेल ती पद्धत अंमलांत आणण्यासाठी कानूंत जरूर त्या दुरुस्त्या करण्यास मुंबई विभागाच्या असिस्टंट रजिस्ट्रारनीं कांहीं सोसायट्यांस कळविलें आहे. (१) सोसायटीनें आपल्या व्यवहारक्षेत्राचे गट पाडावे आणि एकाच दिवशीं, एकाच वेळीं, प्रत्येक गटांत सभा बोलवावी. मुख्य कचेरीच्या ठिकाणची सभा आणि बाकीच्या ठिकाणच्या सभा मिळून एक साधारण सभा समजली जाईल. प्रत्येक सभेंत त्याच विषयांचा विचार होईल आणि त्या संबंधांतील प्रत्येक ठिकाणच्या मतांची बेरीज करण्यांत येऊन प्रश्नाचा निकाल ठरविला जाईल. (२) सभासदांच्या संख्येचे प्रमाणांत सोसायटीनें आपल्या क्षेत्राचे गट पाडावे आणि गटवार सभा भरवाव्या. सभासदांनीं आपल्या गटाच्या सभेस हजर राहून कांहीं विशिष्ट सभासदांची निवड करावी. हे सभासद म्हणजे एक प्रकारचें सेंट्रल बोर्ड बनेल आणि त्यास साधारण सभेचे अधिकार प्राप्त होऊन तिचें कामहि करतां येईल. ह्या योजनेमुळें सभासदांस आपला, सोसायटीची कारभार बघण्याचा हक्क बजावतां येईल आणि कार्य करणाऱ्या मंडळास सुटसुटीतपणा प्राप्त होईल. वरील दोन पद्धतींपैकीं पहिली पद्धत व्यापक व्यवहार क्षेत्राच्या सोसायटीस विशेष सोयीची असून दुसरी पद्धत ज्या सोसायटीच्या पटावरील सभासदांची संख्या प्रचंड आहे अशा सोसायटीस सोयीची आहे. प्रॅक्सीची मतदान पद्धति सहकारी तत्त्वास धरून नाहीं.

वाई अर्बन को. बँक लि., वाई

वरील बँकेचे २६८ सभासद असून भाग भांडवल १८,६७५ रुपये आहे. रिझर्व्ह फंडांत ९,३६२ रुपये आणि इतर फंडांत ३,८६३ रुपये आहेत. एकूण ठेवी सुमारें ८४ हजारांच्या आहेत. बँकेचें सभासदांकडे येणें ७९ हजारांचें आहे. थकबाकी ३६½ हजार रुपये असून बँक 'क' वर्गांत गेली आहे. लवादनिवाड्यांत २३ हजारांची रकम अडकली आहे. अहवालाचे वर्ष अखेर बँकेस निवळ नफा ३,९५१ रुपये झाला, त्यांतून भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड देण्याबाबत डायरेक्टर बोर्डानें शिफारस केली. बँकेची प्रगति समाधानकारक होत असली तरी सभासदांनीं तिच्या कामकाजांत अधिक लक्ष घालणें आवश्यक दिसतें. "वार्षिक सभेशिवाय इतर सभांमध्यें हजेरीचें प्रमाण उत्साहजनक नाहीं" असा अहवालांत शेरा आहे. थकबाकी कमी करण्याचे कामींहि सभासदांनीं बँकेशी सहकार्य करणें अगत्याचें आहे.

बॉंबे प्रॉ. को. बँक पालघर शाखा

बॉंबे प्रॉ. को. बँक लि. च्या पालघर शाखेची सातवी वार्षिक साधारण सभा ता. १-१०-३८ रोजीं शनिवारीं, दुपारीं १ वाजतां पालघर येथें भरणार आहे.

कॉसमॉस को. अर्बन बँक लि. पुणें

ह्या बँकेचे २०६२ सभासद आहेत. सभासदांची कमाल मर्यादा ३,००० पर्यंत आहे. भाग भांडवल ८३,९४० रुपयांचें असुन गंगाजळींत ३०½ हजार रुपये आहेत. सर्व प्रकारच्या ठेवींवरील व्याजाचे दर बँकेनें कमी केले तरी ठेवींतील रकम वाढत आहे. १९३७-३८ अखेर ४ लक्ष, २१½ हजार रुपयांच्या ठेवी बँकेकडे आहेत. सभासदांकडील कर्जांत १ लक्ष, ७४ हजार रुपये गुंतलेले असून थकबाकीचें प्रमाण शेकडा ९·५ वरून ६·७ पर्यंत उतरलें आहे, हें समाधानकारक आहे. न्यू इंडिया, ज्युपिटर, व्हलकन आणि लॉ युनियन ॲन्ड रॉक ह्या कंपन्यांची आगीच्या विम्याची एजन्सी बँकेनें घेण्यास रजिस्ट्रारनीं परवानगी दिली आहे. सोनें आणि चांदी ह्यांचे तारणावर ५० हजार रुपयांपर्यंत कर्जे देण्यासहि त्यांनीं मान्यता दिली आहे. बँकेच्या स्वतःचे मालकीच्या इमारतीबाबत रजिस्ट्रारशी वाटाघाट चालू आहे. वर्षअखेर बँकेस ११,५६८ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ७½ % दरानें ६,०९० रुपये वांटण्यांत येतील. बँकेची धिमेपणानें सर्वांगीण प्रगति होत आहे. बँकेची वार्षिक सभा ता. २५-९-३८ रोजीं भरली होती.

खेड व जुन्नर तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि., खेड

खेड तालुक्यांत एकंदर ३१ सोसायट्या आहेत, त्यांचेकडील मेंबर ठेव २६½ हजार रुपये आहे. नॉन मेंबर ठेव ७½ हजार रुपये आहे. बँक कर्ज २ लक्ष, २३½ हजार रुपये देणें आहे. मेंबरांकडे २ लक्ष, ९७ हजार रुपये कर्ज येणें निघतें, त्यापैकीं थकलेली बाकी २ लक्ष रुपये असून २२ हजार रुपयांच्या बाकीस तहकुबी दिलेली आहे आणि ८१ हजार रुपये लवादांत गुंतलेले आहेत. सोसायट्यांचा रिझर्व्ह फंड ८२ हजार रुपये आहे. २० सोसायट्यांचे ताब्यांत ४१½ हजार रुपयांच्या ४८२ एकर जमिनी शिलक राहिल्या आहे. जमिनींत गुंतलेलें भांडवल योग्य तें उत्पन्न देत नाहीं. खेळत्या भांडवलाशीं खर्चाचें प्रमाण उतरून २·२% झालें आहे. सोसायट्यांचे पंच कमिट्यांवर बऱ्याच ठिकाणीं थक बाकीदार पंच असलेले आढळतात. सोसायट्यांचे ताब्यांत आलेल्या जमिनींचा जाहिर लागण लिलांव करण्याचे कामीं हयगय केली जात असल्याचें कांहीं ठिकाणीं दिसतें. सोसायट्यांचे ग्रुप सेक्रेटरी व सेक्रेटरी ह्यांचेकरितां उजळणी वर्ग ता. १-६-३८ ते ४-६-३८ पर्यंत यूनियननें भरविला होता.

सारस्वत को. बँक लि.

वरील बँकेचे पटावर १,३२६ सभासद असून ६४, ८१६ रुपयांचें भांडवल वसूल झालेलें आहे. रिझर्व्ह आणि इतर फंडांत ४५½ हजार रुपये आहेत. बँकेकडे ९½ लक्षांच्या ठेवी आहेत. सभासदांकडे २ लक्ष, ६७ हजार रुपये येणें आहेत. थकबाकीचें प्रमाण ७% पडतें. ७ लक्ष, ९ हजार रुपये सरकारी आणि इतर रोख्यांत गुंतविलेले आहेत. वर्ष अखेर बँकेस १०½ हजार रुपये नफा झाला, त्यांतून ६½% दरानें डिव्हिडंड वांटण्यांत आलें. श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं बँकेची प्रगति चांगली होत आहे.

मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याचा अहवाल

(१९३६-३७)

मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याचा, सन १९३६-३७ संबंधींचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. हिंदुस्थान हा देश कृषिप्रधान असल्यानें शेतीचे धंद्यास येथें विशेष महत्त्व आहे आणि विशेषत: अलीकडे शेतीचे प्रश्नाकडे सरकारचें आणि जनतेचें लक्ष लागलें असल्यामुळें तिच्या प्रगतीचा वृत्तांत सर्वांसच जिव्हाळयाचा झाला आहे. मुंबई प्रांताच्या शेतकी खात्याचा सन १९३६-३७ संबंधीं अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, तो ह्या दृष्टीनें उद्‌बोधक आहे. मुंबई प्रांतांतील पिकांचे एकूण क्षेत्रफळामध्यें गेल्या पांच वर्षांत विशेष वाढ अगर घट झालेली नाहीं. धान्यें आणि भुइमूग ह्यांच्या पिकांचें क्षेत्रफळ कायमच राहिलें. तथापि, पेरणीचे वेळीं पुरेसा पाऊस न पडल्याकारणानें कपाशीची लागवड कमी झाली. सन १९३५-३६ मध्यें ४१ लक्ष, ६३ हजार एकरांत कपास पेरलेली होती; सन १९३६-३७ मध्यें फक्त ३७ लक्ष, १४ हजार एकरच कपाशी खालीं होते.

प्रात्यक्षिकें, प्रचार, बियांची वाटणी, जमीन सुधारणा, पिकांचें संरक्षण इत्यादि बाबतचें शेतकी खात्याचें कार्य अहवालाचे वर्षी प्रत्येक जिल्ह्यांत चालूं होतें. जमीन सुधारणेच्या योजनांची उपयुक्तता शेतकरी वर्गास पटत चालली असल्याचें अहवालावरून दिसून येतें. एकट्या नाशिक जिल्ह्यांतच ३,२५० एकर जमीनीचें, सोप्या परंतु शास्त्रीय पद्धतीनें बंधारे घालून संरक्षण करण्यांत आलें. सुधारलेल्या पद्धतीच्या बियांचा प्रसार यशस्वी होत आहे. जरिला कपास खानदेशांत लोकप्रिय झाली असून दक्षिण भागांत जयवंत आणि गदग नं. १ ह्या कपाशीची लागवड वाढत आहे. मुगद आणि कुमठा फार्ममध्यें संशोधनपूर्वक तयार केलेल्या सुधारलेल्या तांदुळाच्या जातींची धारवाड, बेळगांव आणि कानडा जिल्ह्यांत लागवड झपाट्यानें वाढत आहे. अहवालाचे वर्षी पावसाच्या कमतरतेमुळें, सोलापूर आणि विजापूर जिल्ह्यांतील "ड्राय फार्मिंग" शेतीच्या प्रयोगांस विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. ह्या संशोधनाचा फायदा नेहमींच्या शेतीस मिळूं लागला असून, त्या जिल्ह्यांत ज्या ठिकाणीं नवीन पद्धतीचा अवलंब करण्यांत आला, तेथें धान्याचें आणि कडब्याचें उत्पादन दिढीनें वाढलें असल्याचें आढळून आलें. शेतीचें वन्य जनावरांपासून रक्षण करण्यासाठी 'बंदूक संघ' स्थापन करण्याचे कामीं बरीच प्रगति झालेली आहे. दक्षिण भागांतील सुमारें ८५ हजार एकरांतील पिकांचें ह्यामुळें चांगलें संरक्षण झालें.

शेतीच्या मालाचे उत्पादनांत वाढ अगर सुधारणा होऊन केवळ भागत नाहीं, मालाच्या उठावाकडेहि लक्ष देणें आवश्यक असतें. अहवालाच्या वर्षी सरकारनें द्राक्षें, तंबाखू, संत्रीं इत्यादींची प्रतवारी ठरवून दिली आणि नाशिक येथील द्राक्षांची प्रत्यक्ष प्रतवारी लावण्याची योजना हातीं घेतली. बॉम्बे कॉटन मार्केट्स ॲक्टाखालीं दोन ठिकाणीं कॉटन मार्केट्स स्थापण्यांत आलीं. फ्रूट ॲन्ड व्हिजिटेबल मार्केटिंग कमिटी नेमण्यांत आली. शेतकी खात्यानें, आंबे आणि फळें परदेशीं पाठविण्याचें कामांत उपयुक्त सल्ला देण्याचें काम केलें. खोपोली येथील टाटांच्या पावर हाऊसमधून वहाणाऱ्या पाण्याचा विनियोग कुलाबा जिल्ह्यांतील शेतीसाठी करण्याचा सरकारचा विचार आहे आणि त्याबाबत कांहीं प्रयत्न चालूं आहेत. हलीं काढण्यासाठी ट्रॅक्टरचा उपयोग, वृक्षारोपण, खेडेगांवांतील आरोग्यसंवर्धन, शेणाचा खताकडे उपयोग, इत्यादि प्रश्नांकडेहि शेतकी खात्यानें लक्ष पुरविलें. प्रांतांतील शेतकऱ्यांची संख्या, त्यांचेपुढील अनेक प्रश्न, त्यांच्या अडीअडचणी, इत्यादि लक्षांत घेतलीं असतां सरकारच्या शेतकी खात्याचें महत्त्व दिवसानुदिवस वाढत जाणार हें उघड आहे. शेतीसंवर्धनाचे बाबतींत सरकारनें प्रगतिपर धोरण राखून शेतकी खात्याच्या खर्चाची पुरेशी तरतूद केली, तर ती योग्य कारणीं लागेल, हें उघड आहे. हिंदुस्थानाच्या वाढत्या लोकसंख्येस पुरेसें अन्न मिळवून देण्यासाठी जमीनींची उत्पादनशक्ति वाढणें अत्यावश्यक असल्याविषयीं आतां शंका उरलेली नाहीं. लागवडीखालीं येण्याजोगी जमीन आतां फारशी शिल्लक नाहीं, ह्या दृष्टीनें शेतीच्या मालाचें दर एकरी उत्पादन वाढणें अत्यंत जरूरीचें झालेलें आहे. उद्योगधंद्यांच्या वाढी इतकेंच, किंबहुना जास्त, शेतीच्या धंद्याच्या सुधारणेचें महत्त्व आहे. शेतकऱ्यांची म्हणजे बहुसंख्य लोकांची उन्नती शेती-सुधारणेवर अवलंबून आहे हें सरकारनें ओळखलेलें आहे. शेतकऱ्यांच्या सुधारणेचा प्रश्न जितका व्यापक तितका तो सुटण्याचा मार्गहि बिकट आहे. शेतकी खात्याचे प्रयत्न ही तो प्रश्न सोडविण्याची एक दिशा आहे. अनेक बाजूंनीं एकदम प्रयत्न केले, तर शेतकऱ्यांची उन्नति होण्यास अतिशय सहाय होईल.

विमा कंपन्यांचें एकीकरण

मॉडर्न इंडिया लाइफ ॲशुअरन्स कंपनी ही आर्य इन्शुअरन्स कंपनीस मिळाली आहे, आणि ह्या योजनेस कलकत्ता हायकोर्टानें मंजुरी दिली आहे. श्री. एच. के. सेन ह्यांनीं दोन्ही कंपन्यांचें मूल्यमापन केलें त्यांत आर्य कंपनीचे हिशेबामध्यें ५३ हजार रुपयांचा वाढावा आढळला. मॉडर्न इंडियाचे हिशेबांत ४९ हजारांची तूट दिसून आली. ही तूट भरून काढण्यासाठी, तिच्या भागीदारांनीं आपल्या भरणा झालेल्या भांडवलाची किंमत शेकडा ८७½ टक्क्यांनीं कमी करण्यास अनुमति दिली आहे. म्हणजे ८७,८२५ रुपये भांडवलापैकीं ७६,८४६ रुपये भांडवल नाहींसें झालें असून, केवळ १०,९७९ रुपयांचें भांडवलच आतां बाकी राहिलें आहे. एकीकरणाच्या योजनेमुळें, मॉडर्न इंडियाच्या विमेदारांचें नुकसान थांबलें आहे. आर्य कंपनीचीहि परिस्थिति त्यामुळें जास्त भक्कम झाली आहे. आर्य कंपनीचे रिझर्व्ह बँकेकडे १ लक्ष, ५३ हजारांचे रोखे अनामत आहेत, तिच्या लाइफ फंडांत १ लक्ष, ३५ हजार रुपये आहेत आणि तिच्या हिशेबांत ५३ हजारांचा वाढावा आहे.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाउस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक-पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

वर्धा येथील शिक्षणासाठीं शिष्यवृत्त्या

ऑल इंडिया व्हिलेज वर्कर्स ट्रेनिंग स्कूल, वर्धा येथें कागद तयार करण्याचे आणि तेल गाळण्याचें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस अनुक्रमें पंधरा आणि दहा शिष्यवृत्त्या देण्यासाठी एकूण पंचवीस शिष्यवृत्त्या मुंबई सरकारनें मंजूर केल्या आहेत. वर्गाचें येतें अधिवेशन १ डिसेंबर, १९३८ रोजीं सुरू होईल. वर्ग एकूण पांच महिने चालेल. प्रत्येक शिष्यवृत्ती ८० रुपयांची आहे आणि त्यांत शिक्षण, रहाणें, भोजन, इत्यादिबाबत वर्ग संपेपर्यंत येणाऱ्या सर्व खर्चाचा समावेश होतो. विद्यार्थी अगर त्यांस पाठवणाऱ्या संस्था ह्यांनीं जाण्यायेण्याचा प्रवासखर्च आणि शिक्षण चालू असेपर्यंत लागणारा किरकोळ खर्च सोसला पाहिजे. सर्पणास प्रत्येकी दोन रुपये पडतात, तेहि त्यांनींच दिले पाहिजेत.

शिष्यवृत्त्याकरितां अर्ज ता. १५ ऑक्टोबरपर्यंत अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचे प्रांतिक कमिटीस पोचतील, अशा बेतानें पाठवावे. उमेद्वारांची निवड करतांना ग्रामोन्नतीचें ज्यांनीं अगोदर कार्य केलेलें आहे आणि जे आपल्या ज्ञानाचा उपयोग जनसेवेकडे करतात अशा अर्जदारांस प्राधान्य मिळेल. ज्या धंद्याचें शिक्षण पाहिजे असेल, तो धंदा करणाऱ्या जातींतील उमेदवारांच्या अर्जांचाहि आधी विचार होईल. अ. भा. ग्रामोद्योग संघाचे सभासद, एजंटस आणि विनावेतन काम करणारे कार्यकर्ते, अ. भा. चरखा संघाचे एजंट्स, स्थानिक काँग्रेस कमिट्या अगर सहकारी सोसायट्यांसारख्या नोंदलेल्या संस्था ह्यांपैकीं कोणाची तरी अर्जास शिफारस असल्याविना तो विचारांत घेतला जाणार नाहीं.

अ. भा. ग्रामोद्योगसंघानें, वर्गांत विद्यार्थी दाखल होण्यासंबंधीं खालील नियम केले आहेतः—

(१) संघाच्या ट्रेनिंग स्कूलचे वर्षास १ डिसेंबर, १९३८ रोजीं प्रारंभ होईल.

(२) १ नोव्हेंबर नंतर विद्यार्थी दाखल केले जाणार नाहींत. १ डिसेंबर रोजीं अगर त्यापूर्वी विद्यार्थ्यांनीं हजर झाले पाहिजे.

(३) अभ्यासक्रम पांच महिन्यांचा असेल. खालील दोन धंद्यांपैकीं एका धंद्याचें शिक्षण आणि ग्रामकार्यासंबंधीं थोडें तात्त्विक ज्ञान विद्यार्थ्यांस दिलें जाईल. धंद्यासंबंधीं शिक्षणाकडे रोजीं निदान चार तास तरी खर्च केले जातील.

१ कागद तयार करणें.
२ तेल गाळणें.

पुढील विषयांचें तात्त्विक ज्ञान दिलें जाईलः—

१ गांधी विचार दोहन
२ खेडेगांवाविषयीं अर्थशास्त्र
३ आरोग्य व स्वच्छता
४ अ. भा. ग्रामोद्योग संघाची कार्यपद्धति
५ बुक-कीपिंग
६ लहानसहान व्यवसायांमार्फत शिक्षण

एप्रिल अखेर विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाईल आणि आवश्यक वाटल्यास अभ्यासक्रमाची मुद्दत वाढविण्यांत येईल.

अर्जदाराचें वय २२ पेक्षा कमी असतां कामा नये आणि त्याची शरीरप्रकृति चांगली असून शारीरिक कष्ट करण्यास तो लायक असावा. वर्धा येथें आल्यावर कमिटी त्याची चाचणीची परीक्षा घेईल. प्रत्येक अर्जदाराचें शिक्षण इंग्रजी मॅट्रिकपुरतें मिळाल्या तोडीचें तरी झालेलें असेल, अशी अपेक्षा आहे. पुरेसें ज्ञान नसणाऱ्या अर्जदारांस नापसंत केलें जाईल. त्यांस कामापुरतें हिंदी अगर इंग्रजी भाषेचें ज्ञान असलें पाहिजे, ते नेहमीं खादी वापरणारे असणें आवश्यक आहे आणि स्वच्छता राखण्याचें (संडास साफ करणें, झाडणें इ.), स्वयंपाकाचें (अन्न शिजविणें, दळणें इ.), सूत कातणें, इत्यादि शाळेंतील शिस्तीप्रमाणें करावीं लागणारीं कामें पार पाडण्याची अर्जदाराची तयारी असली पाहिजे.

प्रत्येक विद्यार्थ्याजवळ अंथरुणपांघरूण, कपडे, खाण्यासाठी भांडीं, (एक लोटा, एक भांडें, दोन पातेलीं आणि एक ताट) लिहिण्याचें साहित्य, अभ्यासाचीं पुस्तकें आणि शक्य असल्यास नेतांआणतां येण्यासारखा चरखा, हीं स्वतःचीं पाहिजेत.

अभ्यास चालू असेपर्यंत पांच महिने येणारा स्वतःचा किरकोळ खर्च भागविण्यापुरते पैसे आणि सर्पणासाठीं दोन रुपये प्रत्येकाजवळ असले पाहिजेत.

श्री. वै. ल. मेहता, पोस्ट बॉक्स नं. ४७२, मुंबई ह्यांचेकडून अधिक माहिती मिळूं शकेल.

"महाराष्ट्र कारखानदार परिचय"

भूप्रदेश व लोकसंख्या, बागायती व जिराइती पिकें, खरेदीचा व विक्रायती व्यापार, व्यापार व वहातुकीचे मार्ग, बँकिंग, विमा व्यवसाय, कापूस जिल्हावार माहिती, व्यापार-उद्यमविषयक कांहीं कायदे, कांहीं प्रमुख धंद्यांची जंत्री, कारखानदार परिचय, इत्यादि शीर्षकांखालीं महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांसंबंधीं माहिती एकत्र संकलित करून ती पद्धतशीर मांडण्याचें अत्यंत मोठें आणि कठीण काम वरील परिचय ग्रन्थकर्त्यांनीं पार पाडलें आहे. महाराष्ट्रांतील कारखानदारांचा परिचय हा ग्रंथाचा प्रमुख भाग होय. ही जंत्री शक्य तेवढी परिपूर्ण करण्याचा प्रयत्न संपादकांनीं केलेला दिसून येतो. महाराष्ट्राची आर्थिक आणि व्यापारविषयक माहितीहि स्थूलमानानें दिल्यामुळें ग्रन्थाच्या परिपूर्णतेस सहाय झालें आहे. श्री. आ. रा. भट ह्यांनीं प्रमुख संपादक आणि संग्राहक ह्या नात्यानें ग्रन्थसंपादनास सहकार्य केलें आणि व्यापार व उद्योगधंदे ह्यांसंबंधांतील आपल्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा फायदा लोकांस मिळवून दिला. "महाराष्ट्र कारखानदार परिचय" ग्रन्थाचें काम इतक्या यशस्वी रीतीनें पार पाडल्याबद्दल श्री. भट, उपसंपादक व उपसंग्राहक—श्री. व. का. साठे आणि व्यवस्थापक श्री. फडके व ताटे हे अभिनंदनास पात्र आहेत. ग्रन्थास महाराष्ट्राचा एक विस्तृत नकाशा जोडण्यांत आला असता, तर त्याच्या उपयुक्तेंत भर पडली असती.

वेदांमध्यें काय आहे ?

याबद्दल प्रत्येक हिंदूला माहिती असणें जरूर आहे. ही माहिती पुरुषार्थाच्या वेदाङ्कांत (ऑक्टोबर १९३८) वाचकांना मिळूं शकेल. यांत प्रख्यात विद्वान् महाराष्ट्रीयांचे विद्वत्ताप्रचुर लेख प्रसिद्ध होणार असून, २०० पृष्ठांच्या या विशेषांकाची किंमत २ रु. आहे; पण ३ रु. पाठवून ग्राहक होणारांस वर्गणींतच हा अंक मिळेल. पुरुषार्थाचा नमुना अंक व ग्राहक होणारांसाठी फायदेशीर अभिनव योजना मागवा.

व्यवस्थापक—पुरुषार्थ, औंध, (जि. सातारा)

—किती आनंददायक!—

[१] 'स्कोडा' कंपनीला मशिनरीची सर्व रकम आपल्या सिंडिकेटनें दिली.

[२] सिंडिकेटची मशिनरी किंवा ऊंस कोठेहि गहाण अगर तारण दिलेला नाहीं.

[३] १९३९ सालीं चार लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[४] १९४० सालीं बारा लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[५] महाराष्ट्राच्या औद्योगिक यशाला मदत

व

दरसाल साडेपांच टक्के व्याज व दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.

सविस्तर माहिती व डिपॉझिट फॉर्म खालील पत्त्यावर मिळतील.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, २५७ बुधवार पेठ, पुणें २.

For All Medicinal Requisites

— TRY —

N. MAHADEV & Co.

DISPENSING CHEMISTS AND DRUGGISTS

City Post Office Corner POONA, 2.

FOR SAFETY, ECONOMY AND DURABILITY Consult

V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS AND LICENSED ELECTRICAL CONTRACTORS

Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,३४,४५० वसूल झालेलें भांडवल १,१७,१६५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून)	३%

सरकारी कर्जरोखे

५% करमाफ लोन (१९४५–५५)	११४—८
५% (१९३९–४४) लोन	१०२—६
४% १९४३	१०७—८
३½% बिनमुदत	९३–१५½
३½% १९४७–५०	१०४—८
२¾% १९४८–५२	९९—८

निमसरकारी रोखे

४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) ...	१०९—०
४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत)	१०८—०
४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षें मुदत)	१०८—०
४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३)	१११—०
५% म्हैसूर कर्ज (१९५५)	१२२—०

मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा व मुळ झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

बँका

बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११%	१३९—८
बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०%	१०७—८
सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ...	२९—८
इंपीरिअल बँक (५००) १२%	१५२५—०
बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ५%	६०—०
रिझर्व्ह बँक (१००) ३½%	११२—८

रेल्वेज

दौंड–बारामती (१००) ४½%	१०२—०
पाचोरा–जामनेर (१००) ४½%	९७—४
अहमदाबाद प्रांतज (५००) १२½%	९३७—८
तापी व्हॅली (५००) ७½%	७२०—०

वीज

बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३%	११५–१२
कराची (१००) ९%	१९०—०
पुणें इलेक्ट्रिक (१००) ९%	१७२—८
टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½%	१३४०—०
आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½%	१४४५—०

इतर

बेलापूर शुगर (५०) ७ रु.	१८५—८
इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु.	४२—४
शिंदिया स्टीम (१५) १ रु.	१९—२
न्यू इंडिया विमा (७५–९५) १ रु. ...	३६–१०
ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ...	४०००—०
टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६%	२०७—८
टाटा आयर्न दु. प्रे. (२००) १५ रु. २ आ. ...	१५४—४
टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १० रु.	२८०—०
टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु. ३ आ. ६ पै ...	१३५५–०
असोसिएटेड सिमेंट (१००) ७ रु. ८ आ. ...	१११—०

सोनें–चांदी

सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास	३६–३–०
चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास	५१-११-०

Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.

" URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

Chief Accountant,

Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा कायदा, नियम यासंबंधीं विवेचनात्मक लेखमाला **"न्यायबोध"** या कायद्याच्या मासिकांत क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा. व. ट. ख. सह फक्त ५ रु. म. ऑ नें पाठवा. नमुना अंकासाठी सात आण्याचीं तिकीटें पाठवा.

मॅनेजर,

"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.

शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या

एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षें मुदतीच्या

ठेवी घेणें आहेत

व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ **टक्के** दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.

आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.

पूर्वींची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

द. म. द. शें. ८४चार आणे व्याजानें

व

अनुक्रमानें रु. १०० ते २०००

देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ८२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.

हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. **ब्रँचः**-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

अप-टु-डेट शिलाई करतां

महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. — [खादी भांडाराचे माडीवर

फराडकर टेलर्स ॲकॅडेमी

(सिटी पोस्टासमोर पुणें २)
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

सुप्रसिद्ध संचालक मंडळ व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां **महाराष्ट्र, कर्नाटक** आणि **गोमांतक** प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

(हेड ऑफिस : जळगांव)

माहिती मागवा — **चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस,** लक्ष्मी रोड, **पुणें २**



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[माहितीपत्रक मागवा]

'अभिनंदनीय प्रगति'

असेच बोल नाशिकच्या **सह्याद्रि** विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | **मॅनेजिंग डायरेक्टर**

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी

यांचे **पेढे व वर्फी** वापरा

मोती चौक : : : सातारा

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

K. K. & Co.

Photographic Dealers
POONA

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७,१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.